|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

Grade - B (2.88)
(NAAC Re-Accredited)
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON**

जा.क्र.उमवि/१८/प्राचार्य बैठक/१३३९/२००९ दि. २४.१२.२००९

प्रति,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व कला,वाणिज्य व विज्ञान तसेच
अनुदानित शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालयांचे मा.प्राचार्य

**विषय :-** सहावा वेतन आयोगाच्या शिफारशी प्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सुधारीत वेतन श्रेणी मध्ये वेतन निश्चिती संदर्भात...

महोदय / महोदया,

शासन निर्णय क्रमांक एनजीसी - २००९/(२४३/०९) - युएनआय- १, दि.१२ ऑगस्ट, २००९ अन्वये शिक्षकांच्या वेतन श्रेणी सुधारीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच संकीर्ण २००९/(३२६/०९) - विशि - १, दि. ०७ ऑक्टोबर, २००९ अन्वये, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन श्रेणी सुधारीत करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त अनुषंगाने शासन निर्णयात नमूद तरतुदींप्रमाणे वेतन निश्चितीची जबाबदारी विद्यापीठावर सोपविण्यात आलेली असल्यामुळे विद्यापीठाचे पत्र जा.क्र. उमवि/१८/वेतन निश्चिती/१२५४/२००९, दि.२४.११.२००९ अन्वये, दि. ०१ डिसेंबर, २००९ ते २४ डिसेंबर, २००९ या कालावधीत वेतन निश्चितीचे काम विद्यापीठाकडून करण्यात आले आहे. **पुढील कार्यवाहीच्या दृष्टीने सर्व संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान तसेच अनुदानित शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालयांच्या मा.प्राचार्यांची बैठक बुधवार, दि.०६.०१.२०१० रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे.**

तसेच महाराष्ट्र शासनाने शिक्षणाची गुणवत्ता / दर्जा सुधारण्यासाठी वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने यासंबंधाने महाविद्यालयस्तरावर केलेल्या उपययोजनांबाबतची माहिती तात्काळ सादर करण्याचे निर्देश विद्यापीठास दिलेले आहेत. शासनास सादर करावयाच्या माहितीचे प्रारुप विद्यापीठाच्या संकेत स्थळावर दिलेले आहेत. तरी प्राचार्यांच्या सभेला येतांना अग्रक्रमाने प्रारुपमध्ये दिल्याप्रमाणे सदरची माहिती सभास्थानी उपलब्ध करुन द्यावी.

आपणांस विनंती की, बुधवार, दि.०६.०१.२०१० रोजी सकाळी १०.०० वाजता अयोजित केलेल्या सदर बैठकीस आपण उपस्थित राहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

( डॉ.मु.व.बरीदे )
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी.**
१. मा.कुलगुरुंचे कार्यकारी सहायक, उमवि., जळगाव.

P.B.No.-80, Telegraphic Address : "UTTAMVIDYA" (EPBX) : 0257-2257100, 2258428 & 2258429 Fax : (91) 0257-2258403, (91) 0257-2258408
Website : www.nmu.ac.in E-mail - (1) registrar@nmu.ac.in E-mail - (2) registrar.nmu@gmail.com

**दिनांक 06.01.2009 रोजीच्या वेतन निश्चितीसंबंधी सभेच्या वेळी महाराष्ट्र शासनास सादर करावयाची खालील माहिती प्राचार्यांनी अग्रक्रमाने सोबत आणावी**

## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ क्षेत्रातील महाविद्यालयांसंदर्भात शासनाकडे पाठवावयाच्या माहितीचे प्रारुप

महाविद्यालयाचे नाव :

| अ. क्र. | शासनाकडील माहितीचा मुददा | महाविद्यालयाने केलेली कार्यवाही | कार्यवाही केलेली नसल्यास त्याचे कारण |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्यांची व शिक्षकांची सर्व पदे ३१.०५.२०१० पर्यंत भरणे. | | |
| २. | सर्व पात्र महाविद्यालयांनी मुल्यांकन / पुर्नमुल्यांकनासाठी नॅककडे शैक्षणिक वर्ष २०१०-११ पुर्वी अर्ज सादर करणे. | | |
| ३. | केंद्र व राज्य सरकारकडून प्राप्त झालेल्या सर्व अनुदानासंदर्भात उपयोगीता प्रमाणपत्र (Utilization Certificate) सादर करणे | | |
| ४. | महाविद्यालयांनी त्यांची स्वतंत्र वेबसाईट तयार करुन व राज्य व केंद्र सरकारच्या निर्देशानुसार वेळोवेळी ती अद्ययावत करणे. | | |
| ५. | मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मालमत्तेचा वार्षिक जमा व खर्चाचा ताळेबंद सादर करणे. | | |
| ६. | महाविद्यालयाचे प्रशासन, परीक्षा, कर्मचारी, वित्त यांच्या कामामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा (Modern Technology) वापर करणे. | | |
| ७. | महाविद्यालयाची माहिती अद्ययावत संगणकीकरण करणे (Create database) | | |
| ८. | शासनाचे परिपत्रक क्र. १२/८/०९ आणि Notification ०७.१०.२००९ अन्वये सहाव्या वेतन आयोगाच्या तरतुदीनुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पगाराची निश्चिती करणे | | |
| ९. | शासनाचे परिपत्रक क्र. १२/८/०९ नुसार संप काळातील कामाचे तास भरुन काढणे. | | |

**जा.क्र. :** **(प्राचार्यांची सही व शिक्का)**
**दिनांक :**

प्रति,
**म. संचालक,**
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
उमवि, **जळगाव**